क्र.साप्रवि/रवका/न.क्र.५/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १०९ दिनांक 23/05/2007

विषय : दक्षता व सुरक्षा संचालनालयाच्या अखत्यारीतील अधिका-यांना भ्रमणध्वनीच्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळणेबाबत.

.....

वीजेच्या भारनियमनामुळे सध्या राज्यात उद्रेकाचे वातावरण असल्यामुळे दक्षता व सुरक्षा संचालनालयाच्या अखत्यारित कार्यरत असलेल्या दक्षता कार्यालयातील व फिरत्या पथकातील अधिका-यांना कार्यालयीन कामासाठी संबंधित अधिका-यांशी संपर्क साधण्याकरिता भ्रमणध्वनीच्या खर्चाची (Mobile Phone) प्रतिपूर्ती मिळण्याबाबतची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

२. व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करून दक्षता व सुरक्षा संचालनालयाच्या अखत्यारितील निगम कार्यालय व क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत असलेल्या निम्ननिर्देशित अधिका-यांना खालीलप्रमाणे भ्रमणध्वनी खर्चाच्या प्रतिपूर्तीची सुविधा कंपनीतर्फे त्वरीत उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे.

| अ.क्र. | अधिका-यांचा प्रवर्ग | दक्षता व सुरक्षा संचालनालयाच्या कार्यालयाचे नाव | भ्रमणध्वनीच्या खर्चाची मर्यादा | |
|---|---|---|---|---|
| | | | मासिक | वार्षिक |
| १. | सहाय्यक संचालक | निगम कार्यालय व क्षेत्रिय कार्यालये | रु.७५०/- | रु.९०००/- |
| २. | कार्यकारी अभियंता (अं) | निगम कार्यालय, मुंबई | रु.७५०/- | रु.९०००/- |
| ३. | दक्षता अधिकारी | क्षेत्रिय कार्यालये | रु.६००/- | रु.७२००/- |
| ४. | उप दक्षता अधिकारी व फिरते पथकातील कनिष्ठ अभियंता | क्षेत्रिय कार्यालये व फिरती पथके | रु.५००/- | रु.६०००/- |

३. उपरोक्त अधिका-यांना भ्रमणध्वनी खर्चाच्या प्रतिपूर्तीची मर्यादा वर नमूद केल्यानुसार मासिक किंवा वार्षिक किंवा संबंधित आर्थिक वर्षात झालेला प्रत्यक्ष खर्च यापैकी कमी असलेल्या रकमे इतकी अनुज्ञेय राहील.

४. भ्रमणध्वनी खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याच्या इतर शर्ती व अटी खालील प्रमाणे रहातील.

अ) रोमिंगची सुविधा फक्त राष्ट्रीय स्तरापुरतीच लागू राहील.

ब) भ्रमणध्वनी संच स्वखर्चाने घ्यावा लागेल.

क) भ्रमणध्वनी क्रमांक सर्व संबंधितांना त्वरीत कळविणे आवश्यक राहील.

ड) अधीक्षक अभियंता (स्थापत्य), बांद्रे मुंबई यांच्या पत्र क्र.एसई/एमसीसी/बीएनडी/टेक/४२८९ दि.२३/११/२००६ अन्वये जारी केलेल्या सूचनेनुसार "निकट उपयोगकर्ता समूहासाठी सुविधा" (Closed User Group Facility) असलेले एअरटेल कंपनीच्या भ्रमणध्वनीचे नवीन 'सिमकार्ड' (SIM Card of Airtel) घेणे आवश्यक राहील.

४. सदर सवलत हे प्रशासकीय परिपत्रक निर्गमित केलेल्या तारखेपासून लागू होईल.

(सु. य. पाटील) 23/5
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :

१) विभागीय व त्यावरील स्तराची क्षेत्रीय कार्यालये }
२) निगम कार्यालय, मुंबई येथील विभागीय व कक्ष प्रमुख } यांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार